**महाराष्ट्र शासन**
*सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती*
*www.rodvetamt.org e-mail: : dydt_amt@yahoo.co.in*
*Phone No. २६६३२०, २६६६०४८ /Fax No :- २६६०३२० (personel ):२६६६ १८६*

क्रमांकः०८/प्रशिक्षण/ प्रवेश /२०१२/ ११७६
दिनांक :-२|- २ - २०१२

प्रति,

प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
अमरावती विभाग (सर्व)

प्रकल्प अधिकारी
आश्रम शाळा औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
अंतरगांव / हर्षी / चिखली / सुसर्दा

प्राचार्य,
उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण
संस्था, रहाटगांव

विषय :- राज्यामध्ये १०० कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्याबाबत.
संदर्भ :-

-------०-०-०-------

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, संचालक, (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक२०/सीटीएस/२०१२/४० दिनांक ७-२-२०१२ व सोबत मा. मुख्यमंत्री महोदयाच्या दिनांक २३-१-२०१२ च्या अर्धशासकीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रातील नमुद सुचने प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

( रा.गु.ठाकरे )
निरीक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय,अमरावती

सहपत्र :- वरील प्रमाणे.

प्रतिलीपी :- जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अमरावती /यवतमाळ / अकोला / बुलढाणा / वाशिम यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित.

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

WWW.DVET.GOV.IN e-mail: : dk20_dvet @YAHOO.COM Fax-२२६९१२३७ / २२६७७६९८

Phone No. २२६२०६०४ / २९३.


क्रमांक:२०/सीटीएस/२०१२/२०

दिनांक : ८.२.१२

प्रति,

सह संचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,

प्रादेशिक कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावी/नागपूर

विषय :- राज्यामध्ये १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०११/(१८४/११)/समन्वय, दि.२ फेब्रुवारी २०१२.

उपरोक्त विषयावरील मा.मुख्यमंत्री महोदयांच्या दि.२३.१.२०१२ च्या अर्धशासकीय पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

जागतिक उष्णतामान व त्यामुळे होणारी पाणी टंचाई, जमिनीची धूप यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढील दोन वर्षात १०० कोटी वृक्ष लागवड करुन महाराष्ट्र राज्याला वनाच्छादित करण्याचे ध्येय राज्याने निश्चित केले आहे. १०० कोटी वृक्ष लागवड करण्याचा महाराष्ट्र राज्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्याबाबत उक्त पत्रामध्ये नमूद केल्यानुसार आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना देण्यात याव्यात.

(एच. आर. सुर्यवंशी)

सहाय्यक संचालक

आ.क्र. २२०० दि. १४/२ प्रादेशिक कार्यालय, अमरावती

D:\data26Sept2009\letter 2012.doc

मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

Chief Minister
Maharashtra

अ.शा.पत्र क्र.एफडीईएम-२०११/प्र.क्र.१०८/फ-२

दिनांक :- २३/०१/२०१२

प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांचे कार्यालय क्र. 4657 दि 25-1-12

विषय :- राज्यामध्ये १०० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्याबाबत

जागतिक उष्णतामान व त्यामुळे होणारी पाणी टंचाई, जमिनीची धूप यांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पुढील दोन वर्षात १०० कोटी वृक्ष लागवड करुन महाराष्ट्र राज्याला वनाच्छादित करण्याचे ध्येय राज्याने निश्चित केले आहे.

२. **एक लोक चळवळ** : हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मुख्य सचिव यांनी महसूल विभागनिहाय/ जिल्हानिहाय उद्दिष्ट ठरविले असून दि. २५.१०.२०११ रोजी शासन निर्णयही निर्गमित केलेला आहे. सोबत जिल्हानिहाय उद्दिष्टांचे विवरणपत्रत जोडले आहे. या कार्यक्रमाला लोक चळवळीचे स्वरुप देऊन लोकांना सहभागी करणे आवश्यक आहे. तसेच सर्व स्वयंसेवी संस्था, शाळेतील विद्यार्थी, एन.एस.एस. स्वयंसेवक यांचा या कार्यक्रमामध्ये समावेश करुन घेणे आवश्यक आहे.

३. **रोप वाटिकांचे निर्माण** : सद्य:स्थितीत रोपवाटिका तातडीने उपलब्ध करण्याकरीता रोपवाटिकांना महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये मंजूर करणे व रोपे तयार करुन घेण्याची आवश्यकता आहे. आपणास विनंती करतो की, आपण जिल्हा नियोजन विकास योजनेच्या बैठकीमध्ये १०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचा आढावा घेऊन त्यामध्ये वन, सार्वजनिक बांधकाम, कृषी, सामाजिक वनीकरण, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांना जिल्हानिहाय दिलेल्या उद्दिष्टपूर्तीसाठी केलेल्या नियोजनाचा आढावा घ्यावा. ज्या ठिकाणी रोपांची

-- २ --

सस/श्री.पाटील

कमतरता भासते त्या ठिकाणी खाजगी रोपवाटिकांमार्फत रोपांचा पुरवठा पारदर्शक प्रक्रियेचा अवलंब करुन व शासकीय नियमांच्या अधिन राहून करता येईल.

४. **६२वा प्रजासत्ताक दिवस हा महाराष्ट्रात १०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचा शुभारंभ करुन साजरा करण्याबाबत :** दिनांक २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी झेंडा वंदन कार्यक्रमानंतर आपल्या जिल्ह्यांमध्ये वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांतर्गत रोजगार हमी योजनेखाली रोप लागवडीकरीता खड्डे खोदणे, सीमा बांध, रोप लागवड करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करावा. लोकांमध्ये वृक्ष लागवडीबाबत जागृती निर्माण होण्यासाठी या कार्यक्रमामध्ये लोकांचा सहभाग करुन घ्यावा.

५. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी याबाबत आपल्या काही सूचना आणि समस्या असल्यास आपण मुख्य सचिव यांना कळवाव्यात, जेणेकरुन त्याची सोडवणूक इतर विभागामध्ये समन्वय साधून करता येईल.

६. १०० कोटी वृक्ष लागवड करण्याचा महाराष्ट्र राज्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे. यामध्ये आपण आपले योगदान व सहकार्य देऊन हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यास मदत करावी, अशी अपेक्षा आहे.

( पृथ्वीराज चव्हाण )

प्रति,

सर्व मंत्री महोदय,

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग

सर्व जिल्हाधिकारी